# वाटे... बाकी काही नाही



अनवाणी प्रवास...निस्तेज ऊन...

करी लाही लाही...लाही

वाटे... बाकी काही नाही !

**फुटक्या खापराच्या तुकडयावर लिहिलेलं पहिलं ग- म - भ -न...**

**'ग' गणेशाचा की गरिबीचा? ...**

**ते कधीच न सुटलेलं कोडं !**

**वेताच्या फोकाचे ते पोटऱ्या फोडणारे**

**काळे निळे वळ...**

**आजही शाळेचं नाव काढताच,**

**काळजात उठणारी तीच कळ !**

**मैलोन्‌मैल अनवाणी प्रवास,**

**दगडा-धोंडयात ठेचकाळलेल्या वाटा...**

**रापलेल्या कातडयावर पसरलेलं ते निस्तेज ऊन...**

**आठवांच्या नाहीत...**

**या तर फक्त आसवांच्या वाटा !**

**वाटे ...बाकी काही नाही !!**

उजाड माळरान...वारा बेभान...

आकाशी घार घिरटया घाली...

वाटे... बाकी काही नाही !

तुफान पाऊस...गारांचा नाच...

वाट शांत शांत...खिडकी निवांत..

Prajakta's Copyright

**शेवाळलेल्या सपरात काढलेला,**

**शहरातला पहिला कुबट पावसाळा...**

**इथल्या गटारांच्या घमघमाटात,**

**माझ्या मृद्गंधाच्या आठवणीसुध्दा गुदमरून गेलेल्या !**

**सडक्या भाज्या पाहूनच नुसता जीव घुस्मटत राही,**

**देठांना बरबटलेली मातीच प्यारी,**

**मला शेतावर घेऊन जाई !**

**शहर म्हणजे पैशाचा पाऊस,**

**म्हणे श्रीमंतीचा पूर जिथे !**

**काबाडकष्टात घामात भिजून,**

**लोक कोरडे - एकटे जगतात इथे ! ...**

**वाटे... बाकी काही नाही !!**

बोचरी थंडी...शहारा अंगी...

ऊब मायेची...सोबत यावी...

सोबत यावी...

वाटे ...बाकी काही नाही !

**गावचा पार... आठवणीच फार !**

**शहरात बस्तान... माझ्या गावीच समाधान !**

**खस्ता दोन्हीकडं... तसा आराम कुठंच नाही !**

**पण प्युरिफायरच्या पाण्याला, आपुलकीची गोडी नाही !!**

**शिक्षणानं पैसा दिला,...पण शहरानं सुन्न केलंय !**

**परतीच्या वाटांनाही प्रमोशननं बंद केलंय !!**

**इथं कडाक्याच्या थंडीत...**

**स्वेटरच्याही आधी, न चुकता मला चुलंच आठवते...**

Prajakta's Copyright

**तशी ऊब कुठंतरी हरवून गेलीए...**

**आठवण तेवढी जाळत राहाते !**

जात दिस दिस जात...ऊन वारा पाऊस...

जिणं जरी कसंनुसं, हो रे माणूस!

वाटे ...बाकी काही नाही...

---

गीतकार : प्राजक्ता गव्हाणे© - शंकर जांभळकर ,

गायक/अभिवाचक : सुरेश वाडकर - डॉ. अमोल कोल्हे,

संगीतकार : तेजस चव्हाण,

गीत संग्रह/चित्रपट : कण्हेरीची फुले (२०१२)

Prajakta's Copyright